# गोपनीय

क्र.मुंमप्रविप्रा/बैठक/१२४

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण**
वांद्रे-कुर्ला समूह, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

दिनांक : ९ मार्च, २००९.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक १० फेब्रुवारी, २००९ (मंगळवार) रोजी झालेल्या १२४ व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

सन्माननीय सदस्यांनी याबाबतीत काही हरकती असल्यास कृपया कळवाव्यात ही विनंती.

सही/- ९/३/२००९
सचिव,
**कार्यकारी समिती**

प्रति,

सर्व सदस्य व निमंत्रित

**प्रत अग्रेषित :-**

विधि सल्लागार, मुं.म.प्र.वि.प्रा.

प्राधिकरणाचे अधिकारी

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या १२४ व्या बैठकीचे कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| **दिनांक** | : | **१० फेब्रुवारी, २००९ (मंगळवार)** |
| **वेळ** | : | **दुपारी २.०० वाजता** |
| **सभास्थान** | : | **मा.मुख्यमंत्री यांचे समिती कक्ष, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई - ४०० ०३२.** |

**उपस्थित सदस्य :**

| | |
|---|---|
| श्री.अशोक चव्हाण<br>मा.मुख्यमंत्री | अध्यक्ष |
| श्री.वसंत डावखरे<br>उपसभापती, विधानपरिषद | सदस्य |
| डॉ.(श्रीमती) शुभा राऊळ<br>मुंबईच्या महापौर | सदस्या |
| श्री.रविंद्र वायकर<br>अध्यक्ष, स्थायी समिती,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री.राजहंस सिंह धनंजय सिंह<br>नगरसेवक, बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री.सुनिल प्रभू<br>नगरसेवक, बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री.आशिष शेलार<br>नगरसेवक, बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री.जॉनी जोसेफ<br>मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन | सदस्य |
| श्री.टी.सी.बेंजामिन<br>प्रधान सचिव,<br>नगर विकास विभाग,<br>महाराष्ट्र शासन | सदस्य |

..२/-

डॉ.ज.मो.फाटक
महापालिका आयुक्त,
बृहन्मुंबई महानगरपालिका
सदस्य

श्री.सिताराम कुंटे
सचिव,
गृहनिर्माण विभाग,
महाराष्ट्र शासन
सदस्य

श्री.जी.एस.गील
व्यवस्थापकीय संचालक, सिडको
सदस्य

श्री.रत्नाकर गायकवाड
महानगर आयुक्त
सदस्य-सचिव

**निमंत्रित :**

श्री.जावेद दळवी
महापौर,
भिवंडी-निजामपूर महानगरपालिका

श्रीमती विद्या निर्मळे
महापौर,
उल्हासनगर महानगरपालिका

श्री.नारायण मानकर
नगराध्यक्ष,
नवघर-माणिकपूर नगरपरिषद

श्री.प्रशांत ठाकूर
नगराध्यक्ष,
पनवेल नगरपरिषद

श्री.नंदकिशोर पातकर
नगराध्यक्ष,
कुळगांव-बदलापूर नगरपरिषद

श्रीमती रेखा पष्टे
अध्यक्षा,
ठाणे जिल्हा परिषद

..३/-

श्री.मनुकुमार श्रीवास्तव
सचिव, नगर विकास विभाग व
सचिव (विशेष प्रकल्प),
सामान्य प्रशासन विभाग (अति.कार्यभार),
महाराष्ट्र शासन

श्री.सतीश गवई
व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ

बैठकीच्या सुरुवातीस, प्राधिकरणाच्यावतीने मा.मुख्यमंत्री व प्राधिकरणाचे अध्यक्ष यांचे महानगर आयुक्तांनी स्वागत केले.

मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष प्राधिकरण यांनी, माजी नगर विकास राज्यमंत्री मा.श्री.राजेश टोपे, यांचे प्राधिकरणाचे सदस्य म्हणून बजावलेल्या बहुमोल सेवेबद्दल त्यांचा गौरवपूर्ण उल्लेख केला.

तद्नंतर, मा.मुख्यमंत्री आणि प्राधिकरणाचे अध्यक्ष यांनी रेल्वे मार्गालगत प्रकल्पबाधित १६००० कुटुंबांचे पुनर्वसन उत्कृष्टरित्या पूर्ण केल्याबद्दल रेल्वे बोर्डाने मंजूर केलेली रक्कम देऊन श्री.मिलिंद म्हैसकर, अति.महानगर आयुक्त, श्री.पी.एस.शर्मा, समाज विकास अधिकारी, श्री.स्वामी, उप-समाज विकास अधिकारी, श्री.ओक, उप मुख्य अभियंता व श्री.संजय त्यागी, कार्यकारी अभियंता, रेल्वे विकास महामंडळ यांचा सत्कार मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांच्या हस्ते करण्यात आला व धनादेश देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

त्यानंतर, विषय पत्रिकेवरील बाब टिप्पण्या विचारार्थ घेण्यात आल्या.

**बाब क्र.१ : दिनांक १५ ऑक्टोबर, २००८ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या मागील (१२३ व्या) बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

कार्यवृत्ताच्या संदर्भात खालीलप्रमाणे चर्चा झाली व कार्यवृत्त कायम करण्यात आले. भिवंडी-निजामपूर महानगरपालिकेचे महापौर श्री.जावेद दळवी यांनी बैठकीत अशी सुचना केली की, मनपोली येथील भिवंडी बायपासवर उड्डाणपूल बांधण्याचे काम प्राधिकरणामार्फत हाती घेण्यात यावे. श्री.वसंत डावखरे, प्राधिकरणाचे सदस्य यांना यासंबंधी अशी सुचना केली की,

याबाबतचा निर्णय प्राधिकरणाने सकारात्मक घ्यावा. महानगर आयुक्त यांनी असे स्पष्ट केले की, भिवंडी बायपासचा रस्ता हा सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत "बांधा, वापरा व हस्तांतरीत करा" या तत्वावर राबविण्यात येत असून प्राधिकरणाचा त्यांच्याशी काहीही संबंध नाही. श्री.वसंत डावखरे यांनी असेही सांगितले की, मुंबई महानगर प्रदेशाच्या अंतर्गत जो भाग येतो, त्या प्रदेशाला आवश्यक सुविधा द्यायला पाहिजेत. तसेच कापूरबावडी परिसराला काही सुविधा अत्यावश्यक आहेत त्या द्याव्यात. याबाबत मा.मुख्यमंत्री व प्राधिकरणाचे अध्यक्ष यांनी असे मत व्यक्त केले की, प्राधिकरणाने घ्यावयाच्या कामांबाबतचे मुलभूत धोरण आपण मान्य केले आहे. त्याच प्रकल्पासाठी वित्तीय सहाय्य करण्यात यावे व ते विषय आपल्याकडे घेतले पाहिजेत. तथापि, सर्वच बाबी प्राधिकरणावर लादणे योग्य होणार नाही. श्री.नंदकिशोर पातकर, नगराध्यक्ष, कुळगांव-बदलापूर नगरपरिषद, यांनी बैठकीत अशी सूचना केली की, सर्व सुविधा मुंबईला देण्यात येतात. तथापि, मुंबई महानगर प्रदेशात विद्युत उपलब्ध असून पाण्याची धरणे आमच्याचकडे आहेत. परंतु मुंबई महानगर प्रदेश हे सर्व परिवहनाच्या सुविधा नसल्यामुळे बकाल झालेले आहेत. रात्री सुध्दा वाहतूकीची कोंडी होते. त्यांनी पुढे असेही सांगितले की, एखाद्या वेळेस लोकल गाडयांची वाहतुक विस्कळीत झाल्यानंतर ठाण्याला उतरल्यानंतर कल्याण आणि डोबिंवलीला प्रवाशांनी कसे जावयाचे असा प्रश्न उभा राहतो. या संदर्भात महानगर आयुक्त यांनी स्पष्ट केले की, प्राधिकरणाने ठरविलेल्या धोरणानुसार कामे हाती घेण्यात येतील.

श्री.नंदकिशोर पातकर यांनी असे सूचित केले की, ठाणे सीव्हिल हॉस्पिटल येथे एमआरआय सेंटरबाबत ५ कोटींचे अनुदान मंजूर करावे. मा. मुख्यमंत्री महोदयांनी त्यास मान्यता दिली. याबाबत महानगर आयुक्तांनी बैठकीत असे सांगितले की, सार्वजनिक आरोग्य विभागाकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल. तसेच बदलापूर येथील रुग्णालयात डायलेसिस यंत्रणा सुरु करण्याबाबत रुपये २५ लाखांचे अनुदान मंजूर करण्यात यावे. तसेच बदलापूर येथे पूर्व-पश्चिमेस होत असलेल्या स्कायवॉकची लांबी वाढविणे व पूर्व-पश्चिमेस होत असलेल्या स्कायवॉकला जोडणा-या पादचारी पूल तयार करणे. त्यांनी अशीही सूचना केली की, ठाणे येथून अलिबागसाठी बस सेवा सुरु करावी आणि इतर महानगर प्रदेशात प्रवाशांसाठी सुध्दा बस सेवा सुरु करावी. त्यांनी असे सांगितले की, लोकलमध्ये सध्या

प्रवाशांची गर्दी वाढली असल्यामुळे बस हे वाहतूकीसाठी साधन उपलब्ध करुन देण्यात यावे. महानगर आयुक्तांनी अशी माहिती दिली की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने सर्वंकष परिवहन अभ्यास पूर्ण केला असून या अभ्यासातून असे आढळून आले आहे की, मुंबई महानगर प्रदेशामध्ये मुख्य प्रकल्प हे मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीबाहेर राबविण्यात येतील. श्री.पातकर यांनी असे सूचित केले की, मोनोरेलचा विस्तार हा ठाणे-भिवंडी-कल्याण-बदलापूर पर्यंत करण्यात यावा. त्यांनी असेही सांगितले की, प्राधिकरणाच्या १२३ व्या बैठकीमध्ये सदरहू मुद्याबाबत चर्चा झाली होती. परंतु मागील १२३ व्या बैठकीच्या कार्यवृत्तात सदरहू चर्चेचा उल्लेख केलेला नाही. याबाबत मा.मुख्यमंत्री आणि प्राधिकरणाचे अध्यक्ष यांनी असे निर्देश दिले की, प्राधिकरणाने सदरहू सूचना तत्वतः मान्य करावी आणि त्या दृष्टीकोनातून तांत्रिक/आर्थिक, सुसाध्यता अभ्यास करण्यात यावा. त्यानुसार असे ठरले की, दिनांक १५.१०.२००८ रोजी झालेल्या बैठकीमध्ये ठरल्यानूसार कार्यवृत्त कायम करावे.

त्यानंतर, कार्यवृत्त कायम करण्यात आले.

<u>बाब क्र.२</u> : <u>प्राधिकरणाच्या (१) दिनांक १० सप्टेंबर, २००८ रोजी झालेल्या १२२व्या व (२) दिनांक १५ ऑक्टोबर, २००८ रोजी झालेल्या १२३व्या बैठकींच्या कार्यवृत्तांवरील कार्यवाही अहवाल.</u>

प्राधिकरणाच्या दिनांक १० सप्टेंबर, २००८ रोजी झालेल्या १२२ व्या व दिनांक १५ ऑक्टोबर, २००८ रोजी झालेल्या १२३ व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.

<u>बाब क्र.३</u> : <u>मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाचा सन २००९-१० चा वार्षिक कार्यक्रम.</u>

३.१ मा.महानगर आयुक्त यांनी याबाबत माहिती देताना असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या वार्षिक कार्यक्रम हा २००९-१० मध्ये हाती घ्यावयाचा आहे. या वार्षिक कार्यक्रमांतर्गत २००९-१० मध्ये राबविण्यात येणा-या महत्वपूर्ण प्रकल्पांची सूची महानगर आयुक्त यांनी बैठकीत सादर केली. त्यांनी असेही सांगितले की, मुंबई नागरी विकास प्रकल्प फिरता निधीचा वार्षिक कार्यक्रम (नागरी प्रदेश अर्थसहाय्य) या बाबीचा समावेश वार्षिक

कार्यक्रमात करण्यात आला असून त्यासाठी रु.६८ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. त्यांनी असेही सांगितले की, वार्षिक कार्यक्रम आधारीत अर्थसंकल्पीय अंदाज, माहिती प्राधिकरणास सादर करण्यात येत आहे. त्यांनी असेही सांगितले की, खालील दर्शविल्याप्रमाणे २००९-१० वर्षात एकूण ६८ योजनांना हाती घेण्याचे योजिले आहे. याबाबत रु.६,६५३.६७ कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

**३.२** खालील दर्शविल्याप्रमाणे २००९-१० वर्षात एकूण ६८ योजनांना हाती घेण्याचे योजिले आहे.

**(रुपये कोटीत)**

| विभागाचे नाव | योजनांची संख्या | अर्थसंकल्पीय तरतूद |
|---|---|---|
| परिवहन व दळणवळण विभाग | २३ | २,१०७.१५ |
| नगर व क्षेत्र नियोजन विभाग | १४ | ११७.०० |
| नियोजन विभाग | १० | ५४२.०१ |
| अभियांत्रिकी विभाग | १७ | २,६४८.५० |
| मुंबई नागरी परिवहन प्रकल्प (एमयुटीपी) | ०१ | ७२८.८६ |
| प्रमुख (पूनर्वसाहत व पुनर्वसन प्रकल्प) | ०२ | २१९.०० |
| प्रशिक्षण विभाग | ०१ | ८.५० |
| प्रशासकीय व अन्य खर्च | - | २८२.३५ |
| **एकूण : २००९-१० (वर्ष)** | ६८ | ६,६५३.३७ |
| **एकूण : २००८-०९ (वर्ष)** | ६२ | ६,४२६.३६ |

**३.३** त्यानंतर, प्राधिकरणाने टिपण्णीसह सादर केलेल्या वार्षिक कार्यक्रमांना मंजूरी दिली व पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.११९९</u> :

"**असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की,** (अ) टिपण्णीसह सादर केलेल्या २००९-२०१० सालचा वार्षिक कार्यक्रम व २००९-२०१० सालचा मुंबई नागरी विकास प्रकल्प-फिरता निधीचा वार्षिक कार्यक्रम आणि महानगर योजना फिरता निधीचा (मेगासिटी योजना) वार्षिक कार्यक्रम संमत करण्यात येत आहे. (ब) वार्षिक कार्यक्रमांत अंतर्भूत केलेल्या योजनांच्या तपशिलाला मान्यता देण्यास कार्यकारी समितीला याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

..७/-

**बाब क्र.४ : मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाचे सन २००९-१० चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक.**

४.१ महानगर आयुक्तांनी याबाबत माहिती देताना असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम २३ (१) आणि त्यासोबत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण विनियम १९७६ मधील नियम ४ अन्वये नेमून दिल्याप्रमाणे मुंबई महानगर प्रदेश विकास (मुंमप्रवि) निधीचा २००९-२०१० सालचा अर्थसंकल्प आणि सन २००८-२००९ चे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक स्पष्टीकरणासह बाब टिपण्णीसोबत सादर केलेले आहेत.

४.२ मुंबई नागरी विकास प्रकल्प (MUDP) - फिरता निधी आणि तसेच महानगर (मेगासिटी) योजना-फिरता निधीकरीता केलेले सन २००९-२०१० चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक व सन २००८-२००९ चे सुधारीत अंदाजपत्रक देखील या बाब टिपण्णीसोबत सादर केलेले आहेत.

४.३ राज्य शासनाने मुंमप्रविप्रा अधिनियम, १९७४ चे कलम १८ (१) चे खंड (अ) सन १९९७ मध्ये वगळले आहे. त्यामुळे शासकीय अनुदानातून राबविण्यात येणा-या योजनांना आता शासकीय निर्णयानुसार अनुदान मिळणार नसल्याने या योजनांना प्राधिकरणाच्या निधीतून वित्त पुरवठा करावा लागेल.

४.४ प्राधिकरणाच्या सन २००९-१० सालच्या अंदाजित असलेल्या एकूण जमा रकमा सुमारे रु.४४९०.४० कोटी इतक्या आहेत आणि रु.६६५३.३७ कोटीच्या अंदाजित खर्चाचा विचार करता रु.२१६३.३३ कोटीची तुट दर्शविण्यात आली आहे.

४.५ सन २००९-१० चा संक्षिप्त अर्थसंकल्प पुढीलप्रमाणे आहे.

| जमा | (रुपये कोटीत) |
|---|---|
| १. भू-विक्रीपासून जमा-अनुसूची क | १,५२३.०५ |
| २. ठेवीवरील व्याज व इतर जमा रकमा अनुसूची -ग | २,०३२.८१ |
| ३. जागतिक बँक (मुं.ना.प.प्र.कर्जापोटी) | ३८४.१८ |
| ४. वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर-MRTS ला केंद्रशासनाकडून अंशदान-VGF | ३५०.०० |
| ५. एमआयएएल (MAIL) कडून सहार उन्नत मार्गाकरीता अंशदान | ७५.०० |
| JNNURM कडून अंशदान | १२५.०० |
| एकूण : | ४,४९०.०४ |

<u>वजा - खर्च</u>

| | |
|---|---|
| १. प्रशासकीय खर्च, सर्वेक्षण अभ्यास व जड वस्तू खर्च (जोडपत्र-१ व २) | ३८३.४१ |
| २. योजनांवरील खर्च (विवरण-ब) | ४,७४१.०० |
| ३. स्थानिक संस्थांना कर्जे व इतर खर्च (जोडपत्र-६) | ७९०.१० |
| ४. मुंबई नागरी परिवहन प्रकल्प (एमयुटीपी) (जोडपत्र-७) | ७२८.८६ |
| ५. झोपडपट्टी पुर्नवसन योजनेअंतर्गत बाहय क्षेत्रात पायाभूत सुविधा पुरविणे | १०.०० |
| एकूण : | ६,६५३.३७ |
| तुट | २,१६३.३३ |

४.६ महानगर आयुक्तांनी अशी माहिती दिली की, जमीन विक्रीतून सन २००८-०९ या वर्षामध्ये रु.३,९१०.०६ कोटी इतके उत्पन्न मिळण्याचे अपेक्षित आहे. तसेच त्यांनी असे सांगितले की, प्राधिकरणाने जमीन विक्रीसाठी जी राखीव किंमत ठेवली होती त्याला काहीही प्रतिसाद मिळाला नसून जेट एयरवेज आणि स्टारलाईट यांना ज्या जमिनी विक्रीसाठी देकार देण्यात आला होता, त्या देकारानुसार त्यांनी भूखंड विक्रीपोटीची रक्कम देण्यास असमर्थता दर्शविली आहे. महानगर आयुक्तांनी असेही सांगितले की, अर्थसंकल्पाचे पृष्ठ क्र.१५ वर सन २००९-१० च्या अर्थसंकल्पात प्रकल्प व योजनांवरील खर्च खालील तक्त्यात दर्शविण्यात आला आहे :

(रुपये कोटीत)

| अ.क्र. | योजनेचे नांव | रक्कम |
|---|---|---|
| १. | मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प | ८३०.०० |
| २. | मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्प वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर (MRTS) | ५१८.०० |
| ३. | प्राधिकरणाच्या प्रकल्पाकरीता भूमी संपादन व भूसंचय आणि विकास केंद्र | १००.०० |
| ४. | वडाळा येथे उत्तुंग इमारत/वाणिज्य केंद्र व आंतरराज्य वाहनतळ उभारणी | ४.०० |
| ५. | मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत उड्डाण पूले बांधणे | १७०.०० |
| ६. | वडाळा ट्रक टर्मिनल | ५०.०० |
| ७. | वांद्रे-कुर्ला संकुलातील जी, जीएन आणि जी टेक्स ब्लॉक मध्ये नागरी सुविधा | ११५.०० |
| ८. | वांद्रे कुर्ला जोडरस्ता व प्रवेशमार्गाचे सुधारणा | ३०.०० |
| ९. | वांद्रे कुर्ला संकुलातील इ ब्लॉकमध्ये नागरी सुविधा | ५.०० |
| १०. | विक्रांत युध्द नौकेचे सागरी संग्राहलयात रुपांतर करणे | ५.०० |
| ११. | ओशिवरा जिल्हा विकास केंद्र | २.०० |
| १२. | मिठी नदी विकास (खोलीकरण, रुंदीकरण व संरक्षक भिंत बांधणे) | १००.०० |
| १३. | महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाची इमारत बांधणे | १२.०० |

| अ.क्र. | योजनेचे नांव | रक्कम |
|---|---|---|
| १४. | प्रादेशिक स्तरावर जलस्त्रोताचा विकास (शाही, पोशीर इ. धरणांचा विकास) | १०.०० |
| १५. | पादचा-यांकरीता उन्नत मार्ग व रेल्वे स्थानक परिसरातील वाहतुक व्यवस्था राबविणे स्कायवॉक | ६००.०० |
| १६. | मोनो रेल प्रकल्प | ९३५.०० |
| १७. | मुंबई पारबंदर छन्न मार्ग अंमलबजावणी (MTHL) | ५००.०० |
| १८. | बँकेचे पुर्नप्राप्तण क्षेत्राचा विकास | १०.०० |
| १९. | मुंबईसह निर्मल एम एम आर अभियान | १८४.०० |
| २०. | वडाळा येथे जागांचे पणन व व्यवस्थापन | ०.१० |
| २१. | एम एम आर मधील कर्मचा-यांना प्रशिक्षण इमारत व प्रशिक्षण कार्यक्रम | ८.५० |
| २२. | विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प राबविणे | ३००.०० |
| २३. | पायाभूत सोयीसुविधासह मुंबई महानगर क्षेत्रात भाडेतत्वावर निवासस्थाने बांधणे | १००.०० |
| २४. | पुनर्वसन व पुनर्वसाहत सुविधा पुरविणे | ३५.०० |
| २५. | घनकचरा व्यवस्थापन क्षेत्र विकसित करणे | ३०.०० |
| २६. | मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्प चारकोप-वांद्रे-मानखुर्द | २८.२० |
| २७. | मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्प कुलाबा-वांद्रे | ४.०० |
| २८. | इनोव्हेशन पार्क | १.०० |
| २९. | सिडकोसह मुंबई महानगर प्रदेशातील उर्जा क्षेत्रात सहभाग | १०.०० |
| ३०. | वांद्रे-कुर्ला क्षेत्रामध्ये मोनोरेल | १०.०० |
| ३१. | जलद बस वाहतुक प्रकल्पाचे नियोजन व विकास करणे | १९.०० |
| ३२. | रस्ते व्यवस्थापन, सुरक्षितता व पोलिसांना साधने देणे | ५.०० |
| ३३. | एकीकृत मुंबई महानगर परिवहन प्राधिकरणाद्वारे पार्किंग सुविधा | १०.०० |
| | एकूण | ४७४१.०० |

अंदाजपत्रकावर चर्चा करतांना महानगर आयुक्तांनी अशी माहिती दिली की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हे सूर्याधरणाच्या प्रकल्पासाठी एन.पी.व्ही.(Net Present Value) म्हणून रु.९६.३३ कोटी देणे आवश्यक आहे.

महानगर आयुक्तांनी असेही सांगितले की, सदरहू पाणी हे पश्चिम उप-प्रदेशातील महानगरपालिका/नगरपरिषदांना उपलब्ध करुन देण्यात येईल. मा.श्री.वसंत डावखरे यांनी असे सूचित केले आहे की, तेच पाणी मिरा-भाईंदरकडे येणे शक्य नाही. महानगर आयुक्तांनी त्यानंतर अशी माहिती दिली की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे इनोव्हेशन पार्क उभारण्यात येईल. त्यासाठी १ कोटींची तरतूद सन २००९-१० च्या अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. तसेच सिडकोसह मुंबई महानगर प्रदेशातील ऊर्जा क्षेत्रात सहभागासाठी रु.१० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. या प्रकल्पामधून उर्जा उत्पन्न करण्यात येईल. तसेच हा

प्रकल्प गॅस आधारीत असून मुंबई महानगर प्रदेशातील उद्योगधंद्यांना या प्रकल्पापासून जे वीज उत्पादन होईल ते पुरविण्यात येईल. सिडकोच्या सहभागाने हा प्रकल्प संयुक्त उपक्रमाचा असेल. त्यांनी अशीही माहिती दिली की, वडाळा ट्रक टर्मिनल हे १४ हेक्टर जमिनीवर विकसित करण्यात येत असून तेथे उत्तुंग अशी इमारत बांधण्याचे प्रस्तावित करण्यात आले असून सदरहू इमारतीचे बांधकाम खाजगी सहभागाने करण्याचे प्रस्तावित केले आहे. महानगर आयुक्तांनी अशी माहिती दिली की, मुंबई महानगर प्रदेशातील पाण्याचे जलस्त्रोताचा मालकी हक्क हा प्राधिकरणाने घ्यावा. त्यावर श्री.वसंत डावखरे, सदस्य यांनी अशी हरकत घेतली की, पोशिर व शाही ही धरणे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला मालकी हक्काने घेता येईल का? तथापि, याबाबत जलसंपदा विभागाचे अभिप्राय जाणून घ्यायला हवेत. तसेच धरणाचे काम सुरु करण्यापूर्वी प्राधिकरणाने या धरणग्रस्त लोकांच्या पुनर्वसनाचा विचार करावा. महानगर आयुक्तांनी याबाबत अशी माहिती दिली की, शाही व पोशिर धरणाचे बांधकामासाठी १० ते १५ वर्ष लागणार आहेत. या धरणाचे बांधकाम झाल्यानंतर मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला यापासून चांगले उत्पन्न मिळेल. चितळे कमिटीने शिफारस केल्यानुसार पोशिर धरण बांधल्यानंतर कल्याण, अंबरनाथ व बदलापूर परिसराचा पाण्याचा प्रश्न सुटेल. श्री.रविंद्र वायकर, सदस्य, प्राधिकरण यांनी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या या प्रस्तावाबाबत असे मत मांडले की, मुंबई महानगर प्रदेशाला या प्रकल्पापासून उत्पन्नाचा स्त्रोत मिळेल. त्यामुळे हा प्रस्ताव फार चांगला आहे अशी त्यांनी पुष्टी दिली. श्री.नंदकिशोर पातकर, नगराध्यक्ष, कुळगांव-बदलापूर नगरपरिषद यांनी असे मत व्यक्त केले की, सदरहू धरणाच्या बांधकामासाठी १५ वर्ष लागतील. तसेच पाणी रिसायकलींग करण्यासाठी पैसा द्यावा लागेल हे मान्य करावे.

श्री.सुनील प्रभू, सदस्य यांनी मुंबईसह निर्मल एमएमआर अभियान यासाठी रु.१८४ कोटींची तरतूद सन २००९-१० मध्ये करण्यात आली याबाबतची त्यांनी हरकत घेतली. त्यानंतर त्यांनी याबाबत असेही सांगितले की, मुंबई महानगरपालिकेने झोपडपट्टी आणि स्वच्छता या कार्यक्रमासाठी रु.२०० कोटींची तरतूद केली आहे. सदरहू काम हे म्हाडाने किंवा मुंबई महानगरपालिकेने करावे यावर मा.मुख्यमंत्री आणि प्राधिकरणाचे अध्यक्ष यांनी असे विचार व्यक्त

केले की, सदरहू जबाबदारी ही महापालिकेची आहे. श्री.आशिष शेलार, सदस्य यांनी अशी सूचना केली की, प्राधिकरणाचा अर्थसंकल्प हा रु.२,१६३ कोटी तुट दर्शवित आहे. ही तुट कशी काय भरुन काढणार याबाबत प्राधिकरणाने विचार करावा. प्राधिकरणात जवळजवळ ६ वेगवेगळे विभाग प्रकल्प अंमलबजावणीची कामे करीत आहेत. या प्रकल्पाच्या अंमलबजावणीकरीता रु.६,६५३.३७ कोटी खर्च आहे. त्यामध्ये परिवहन व दळणवळण विभाग आणि अभियांत्रिकी विभागामार्फत जास्तीत जास्त प्रकल्प राबविले जात आहेत. सदरहू तुट भरुन काढण्यासाठी जमिनीची विक्री करणे तसेच टीडीआरची विक्री करणे आवश्यक आहे. त्यांनी असे सूचित केले की, सध्या अमेरिकेत मंदीचे वातावरण आर्थिक क्षेत्रात चालू असून त्याचा परिणाम मुंबईच्या जमीन विक्रीवर झालेला आढळून येत आहे. या आधी जी जमीनविक्री झालेली आहे, त्यापासून प्राधिकरणाला चांगले उत्पन्न मिळणार आहे. तथापि, रु.३,९१० कोटी हे उत्पन्न जमीन विक्रीतून प्राधिकरणाला कसे मिळेल यांचे विश्लेषण महानगर आयुक्तांनी केले पाहिजे. त्यांनी असे निदर्शनास आणले की, सन २००९-१० मध्ये वांद्रे-कुर्ला संकुलातून भूखंड विक्रीपोटी ढोबळमानाने रु.१००० कोटी अपेक्षित आहेत. तसेच वांद्रे-कुर्ला संकुलातील अतिरिक्त चटई क्षेत्र देण्याचे प्रस्तावित केल्याने रु.५२३.०५ कोटी अशी एकूण रु.१५२३.०५ कोटी रक्कम प्राप्त होईल असे अपेक्षित आहे. त्यांनी याबाबत शंका उत्पन्न केली, आणि हे करण्यासाठी प्राधिकरणाकडे काय प्रोत्साहन आहे याबाबत विचारणा केली. त्यांनी असेही सांगितले की, जवाहरलाल नेहरु नागरी पुर्ननिर्माण अभियान (JNNURM) त्यांच्याकडून जे आर्थिक वर्ष २००८-०९ मध्ये रु.६० कोटी केंद्र सरकारकडून मिळणे अपेक्षित होते. परंतु फक्त सुधारीत अंदाजामध्ये सन २००८-०९ साठी ४६ कोटी रुपये मिळतील असा सुधारीत अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. तसेच अर्थसंकल्पीय अंदाज हा सन २००९-१० साठी रु.१२५ कोटीचा करण्यात आला आहे. तरी केंद्र सरकारकडून १२५ कोटी रुपये प्राधिकरणाला मिळणे अशक्य आहे. श्री.आशिष शेलार, सदस्य यांनी असेही सांगितले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हे भूखंड विक्रीची अधिमूल्य आकारते त्यामध्ये सुसूत्रता आणावयास हवी जेणेकरुन भूखंडाच्या विक्रीला प्रोत्साहन मिळेल. मा.मुख्यमंत्र्यांनी असे सांगितले की, सध्या आर्थिक मंदीच्या वातावरणात कोणतीही संस्था जमीन घ्यायला तयार नाही त्यामुळे ज्या ठिकाणी महानगरपालिका आहे त्यांनी त्यांची विकासाचे काम

त्यांचे उत्पन्नातून राबवावे त्या ठिकाणी प्राधिकरणाने विकासाचे काम हाती घेण्याची आवश्यकता नाही. महानगर आयुक्तांनी असे सांगितले की, दि.१५.१०.२००८ च्या प्राधिकरणाच्या बैठकीत याबाबतचे धोरण निश्चित करण्यात आले आहे. त्या धोरणानुसार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हे विकास कामासाठी वित्तीय पुरवठा करेल. मुंबई महानगर प्रदेशात जलस्त्रोतांचा विकास करण्यासाठी जी तरतूद केली आहे त्या प्रयोजनाबाबत महानगर आयुक्तांनी स्पष्टीकरण केले. मुंबई महानगर प्रदेशामध्ये सर्वांगीण विकास करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हे महत्वाची भूमिका पार पाडू शकते. त्यामुळे महानगर आयुक्तांनी असे सूचित केले की, प्रस्तावित पोशिर व शाही धरणाची मालकी प्राधिकरणाने घ्यावी. महानगर आयुक्तांनी असे सुध्दा याबाबत स्पष्टीकरण दिले की, अशाप्रकारच्या धोरणावर जर गुंतवणूक केली तर ७ वर्षात केलेली गुंतवणूक प्राधिकरणाला परत मिळू शकेल व नंतर निव्वळ उत्पन्न कायमस्वरुपी मिळेल. तसेच सदरहू धरणातील पिण्याचे पाणी तसेच उद्योग आणि वाणिज्यिक विकासाकरीता पाणी उपलब्ध होईल. श्री.वसंत डावखरे, सदस्य, प्राधिकरण यांनी असा उल्लेख केला की, धरणाच्या बांधकामासाठी आणि परिरक्षणासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे आवश्यक ते तंत्रज्ञान नाही. याबाबत महानगर आयुक्तांनी असे स्पष्टीकरण दिले की, सदरहू धरणाचे बांधकाम हे संबंधीत संस्था उदा.पाटबंधारे विभाग किंवा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करण्यात येईल. तथापि, याबाबत बांधकामाच्या निधीची तरतूद मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यात येईल. श्री.जॉनी जोसेफ, मुख्य सचिव यांनी असे सांगितले की, अशा प्रकल्पासाठी द्विपक्षीय व बहूपक्षीय संस्थाकडून निधी मिळण्याची शक्यता आहे. त्यावर मा.मुख्यमंत्री आणि प्राधिकरणाचे अध्यक्ष यांनी असे सांगितले की, अशा परिस्थितीमध्ये महसूलाच्या उत्पन्नाचा हिस्सा हा यथाप्रमाण तत्वावर करणे शक्य आहे. महानगर आयुक्तांनी असे सुध्दा स्पष्ट केले की, जलस्त्रोताच्या विकासासाठी अर्थसंकल्पाच्या तरतूदीमध्ये पोशीर व शाही धरणाच्या सर्व्हेक्षण व सल्लागारांच्या खर्चाचा समावेश करण्यात यावा. महानगर आयुक्तांनी त्यानंतर ऊर्जा क्षेत्राच्या विकासाच्या तरतूदींचे स्पष्टीकरण केले. सिडकोच्या सहभागाने ऊर्जा निर्मिती करण्याच्या प्रस्तावाबाबत मा.मुख्यमंत्र्यांनी प्रस्तावांची प्रशंसा केली आणि त्यांनी असे निर्देश दिले की, याबाबतच्या पद्धती हया निश्चित करण्यात याव्यात. महानगर आयुक्तांनी वडाळा ट्रक टर्मिनल

येथे उत्तुंग इमारतीच्या संकल्पनेबाबत भूमिका स्पष्ट केली. त्यांनी याबाबत असे सांगितले की, सदरहू इमारत ही सर्वात उंच राहणार असून ५६ हेक्टरच्या समप्रमाणात चार जमिन निर्देशांकाच्या दराने वाणिज्यिक विकास करता येईल. त्याचप्रमाणे अविरत तत्वावर महसुलाची निर्मिती करणे प्राधिकरणाला शक्य होईल. महानगर आयुक्तांनी इनोव्हेशन पार्कची संकल्पना ही संयुक्त उपक्रमाद्वारे राबविण्याबाबत स्पष्ट केले असून त्यामुळे विकासास हातभार लागेल. मुंबई शहरामध्ये झोपडपट्टी सुधारण्याकरीता तसेच निर्मल अभियानाकरीता जी प्रत्येकी १०० कोटींची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली त्याबाबत प्राधिकरणाच्या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. काही सदस्यांनी असे सांगितले की, सदरहू कार्यक्रम म्हाडामार्फत राबविण्यास अडचणी येतील. तथापि, मा.मुख्यमंत्री आणि प्राधिकरणाचे अध्यक्ष यांनी असे सांगितले की, या कार्यक्रमाची योग्य अंमलबजावणी करतांना सदरहू समस्या म्हाडामार्फत सोडविण्यात येतील. श्री.आशिष शेलार, सदस्य यांनी अर्थसंकल्पाच्या चर्चे दरम्यान प्राधिकरणाला मिळणा-या अपेक्षित उत्पन्न व त्रुटीबाबत मुददे् उपस्थित केलेत. याबाबत मा.मुख्यमंत्री व प्राधिकरणाचे अध्यक्ष यांनी असे निर्देश दिले की, ४ ते ५ महिन्यानंतर प्राधिकरणाला किती उत्पन्न प्राप्त होईल त्यांचे पुनर्विलोकन करण्यात यावे. त्यानंतर प्राधिकरणाने अर्थसंकल्पीय अंदाज आणि सुधारीत अंदाज यावर विचार करुन तो मान्य केला आणि त्यानंतर खालील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.१२०० :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** प्राधिकरणाच्या अंदाजित जमा व खर्च दर्शविणारा २००९-१० सालाचा अर्थसंकल्प आणि २००८-०९ सालचे सुधारीत अंदाजपत्रक मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम २३(१) अन्वये मंजूर करण्यात येत आहे.

"**आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की,** प्राधिकरण याद्वारे मुंबई नागरी विकास प्रकल्प-फिरता निधी आणि महानगर योजना-फिरता निधी यांचे अंदाजित जमा व खर्च दर्शविणारे सन २००९-१० चे अर्थसंकल्पीय अंदाज व २००८-०९ चे सुधारीत अंदाज यांस मंजूरी देत आहे."

**बाब क्र.५ : नवी मुंबई, ठाणे आणि कल्याण-डोंबिवली महानगरपालिकांच्या विविध पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी कर्जसहाय्य देणे.**

५.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, तीन महानगरपालिकांना मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे कर्ज देण्याचे प्रस्तावित केले आहे. कर्जाचे प्रस्ताव प्राधिकरणास प्राप्त झालेले असून जेएनएनयुआरएम अंतर्गत मंजूर झालेल्या विविध प्रकल्पांचा ५०% खर्च भागविण्यासाठी मुंबई महानगर प्रदेशातील विविध संस्थांकडून प्राधिकरणास कर्जाचे प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत. ठाणे, नवी मुंबई व कल्याण-डोंबिवली शहरांचे मोठया खर्चाचे प्रकल्प जेएनएनयुआरएम अंतर्गत मंजूर झाले असल्यामुळे त्यांची कर्जाची मागणी मोठी असून इतर शहरांना लागणा-या कर्जाची मागणी कमी आहे. नवी मुंबई महानगरपालिकेने जेएनएनयुआरएम व्यतिरिक्त हाती घ्यावयाच्या प्रकल्पांसाठीही कर्जाची मागणी केली आहे.

या तीनही संस्थांनी प्रस्तावितेल्या प्रकल्प खर्चाचा व कर्जाच्या मागणीचा तपशील खालील तक्त्यात दिला आहे :-

(रुपये कोटीत)

| महानगरपालिका | प्रकल्प | एकूण खर्च | कर्जाची मागणी |
|---|---|---|---|
| नवी मुंबई | जेएनएनयुआरएम प्रकल्प - पाणीपुरवठा, मलनिःसारण, कॉरिडॉर सुधारणा, पावसाळी पाण्याची निचरा व्यवस्था, ई-गव्हर्नन्स | २०५३.४५ | ११३७.३० |
| | इतर प्रकल्प - पाणी पुरवठा, परिवहन, सार्वजनिक रुग्णालय, गाव तळे | ३८०.०० | ३४२.०० |
| | **एकूण नवी मुंबई** | २४३३.४५ | १४७९.३० |
| ठाणे | जेएनएनयुआरएम प्रकल्प - पाणीपुरवठा, नाले विकास, मलनिःसारण, रस्ते, घनकचरा व्यवस्थापन, तलाव संरक्षण, पावसाळी पाण्याची निचरा व्यवस्था | १०८७.०९ | ५४३.५४ |
| कल्याण-डोंबिवली | जेएनएनयुआरएम प्रकल्प - मलनिःसारण, पावसाळी पाण्याची निचरा व्यवस्था, पाणी पुरवठा, बीएसयुपी | ९५२.९६ | २९६.८२ |
| | **एकूण नवी मुंबई, ठाणे व कल्याण-डोंबिवली महानगरपालिका** | ४४७३.५० | २३१९.६६ |

५.२ कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या कर्जाच्या प्रस्तावाबाबतच्या मुद्यांवर महानगर आयुक्तांनी असे स्पष्ट केले की, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेची कर्ज परतफेडीची क्षमता ही फक्त ११२ कोटी रुपयांची असून त्यापेक्षा जास्त रक्कम ही त्यांच्या परतफेडीच्या क्षमतेच्या पलिकडे आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने कल्याण-डोंबिवली महापालिकेची जी कर्ज परतफेडीची क्षमता आहे, या बाबीवर श्री.वसंत डावखरे, सदस्य, प्राधिकरण यांनी असहमती दर्शविली. त्यामुळे बैठकीत असे ठरविण्यात आले की, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने त्यांची कर्ज परतफेडीची क्षमता दर्शविणारा सुधारीत प्रस्ताव प्राधिकरणास सादर करावा. तद्नंतर प्रस्तावाची छाननी प्राधिकरणाकडून करणे शक्य होईल. कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या खर्चाच्या प्रस्तावास मंजूरीबाबत असे ठरविण्यात आले की, ११२ कोटी रुपयांच्या कमाल मर्यादेच्या अधीन राहून या निधीमध्ये प्रकल्पांच्या चार प्रस्तावांचा समावेश करण्यात यावा. नवी मुंबई, ठाणे आणि कल्याण-डोंबिवली महानगरपालिकांच्या विविध पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी कर्ज सहाय्य देण्यात यावे.

५.३ नवी मुंबई महानगरपालिकेचे रु.५८४.१८ कोटी खर्चाचे २ प्रकल्प मंजूर झाले आहेत. इतर प्रकल्प नजिकच्या भविष्यकाळात मंजूर होण्यासंबंधी अनिश्चितता असल्यामुळे तुर्तास मंजूर प्रकल्पांच्या ५०% इतके कर्ज देण्याचे प्रस्तावित आहे. कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने जरी रु.२९६.८२ कोटी कर्जाची मागणी केली असली तरी पालिकेच्या परतफेडीच्या क्षमतेनुसार रु.११२.५२ कोटी कर्ज देणे शक्य आहे. यामुळे पालिकेच्या केवळ २ मंजूर प्रकल्पांसाठी खर्चाच्या ५०% रक्कम कर्ज म्हणून देता येईल. सदर कर्ज हे १५ वर्षासाठी ८ टक्के दराने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. श्री.वसंत डावखरे यांनी अशी सूचना केली की, एकंदर चार प्रकल्पासाठी ही रक्कम ११२ कोटी रुपये विभागून देण्यात येणार आहे. तरी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेला सुधारीत प्रस्तावानुसार रु.२९६.८२ कोटी जी खर्चाची मागणी केली आहे ती देण्यात यावी. महानगर आयुक्तांनी याबाबत असे स्पष्टीकरण दिले की, या नागरी स्थानिक संस्थांची कर्ज परतफेडीची क्षमतेच्याबाबत चाचपणी केल्यानंतरच संबंधीत नगरपालिकांना कर्ज वितरीत करण्यात येते.

..१६/-

श्री.वसंत डावखरे यांनी अशी सूचना केली की, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडून कर्ज फेडीची हमी घेण्यात यावी. मा.मुख्यमंत्री यांनी असे मत व्यक्त केले की, महानगरपालिकेस कर्जाची परतफेड करता आली पाहिजे. तरीसुध्दा महानगरपालिकेकडून परतफेडीच्या क्षमतेबाबत व मिरा-भाईंदर / भिवंडी महानगरपालिकेकडून सुधारीत प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर प्राधिकरण पुर्नविचार करेल. डॉ.ज.मो.फाटक, महापालिका आयुक्त यांनी असे सुचित केले की, हडकोद्वारे अशा प्रकल्पांना वित्तीय सहाय्य पुरविण्याची तरतूद आहे. महाराष्ट्र राज्याचे मुख्य सचिव यांनी असे मत व्यक्त केले की, आपण नागरी सुविधा पुरविण्यासाठी फक्त पुरक भूमिका पार पाडतो आहोत. त्यावर श्री.वसंत डावखरे यांनी असे सांगितले की, आम्ही तुम्हांला कागदोपत्री हमी देण्यास तयार आहोत.

**५.४** प्राधिकरणाने केलेल्या कर्ज प्रस्तावांच्या छाननी (अप्रेझल) नुसार या ३ महानगरपालिकांना खालील तक्त्यात दर्शविल्यानुसार कर्ज देण्याचे प्रस्तावित करण्यात येते :-

**(रुपये कोटीत)**

| **महानगरपालिका** | **प्रकल्प** | **एकूण खर्च** | **कर्जाची मागणी** |
|---|---|---|---|
| नवी मुंबई | जेएनएनयुआरएम प्रकल्प - पाणीपुरवठा, मलनिःसारण | ५८४.१८ | २९२.०९ |
| | इतर प्रकल्प-पाणी पुरवठा, परिवहन, सार्वजनिक रुग्णालय, गाव तळे | ३८०.०० | ३४२.०० |
| | **एकूण नवी मुंबई** | ९६४.१८ | ६३४.०९ |
| ठाणे | जेएनएनयुआरएम प्रकल्प - पाणीपुरवठा, नाले विकास, मलनिःसारण | ६६९.५२ | ३३४.७६ |
| | शहरातील रस्त्यांचे नुतनीकरण | २७५.७० | ७३.२४ |
| कल्याण-डोंबिवली | जेएनएनयुआरएम प्रकल्प - मलनिःसारण, पावसाळी पाण्याची निचरा व्यवस्था | २२५.०४ | ११२.५२ |
| | **एकूण नवी मुंबई, ठाणे व कल्याण-डोंबिवली** | २१५७.६९ | ११५४.६१ |

**५.५** सदरहू महानगरपालिकांनी ज्या कर्जाची मागणी प्राधिकरणाकडे केली की, त्यांची विनंती अंशतः मान्य करुन मुंबई महानगर प्रदेश विकास निधीतून ११५४.६१ कोटी इतके कर्जाची रक्कम दरसाल दरशेकडा ८% व्याज दर आकारुन १५ वर्षाचे कर्ज परतफेडीच्या कालावधीसाठी प्राधिकरण मान्यता देत आहे.

५.६ वरील प्रस्तावास मान्यता दिल्यानंतर प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :

<u>ठराव क्र.१२०१ :</u>

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम २१अ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, प्राधिकरण याद्वारे ठाणे, नवी मुंबई आणि कल्याण-डोंबिवली महानगरपालिकांच्या जेएनएनयुआरएम अंतर्गत केंद्र शासनाने या आधी मंजूर केलेल्या आणि नवी मुंबई महानगरपालिकेच्या जेएनएनयुआरएम व्यतिरिक्त हाती घ्यावयाच्या प्रकल्पांसाठी महानगरपालिकांनी केलेली कर्जाची विनंती अंशतः मान्य करुन मुंबई महानगर प्रदेश विकास निधीतून रु.११५४.६१ कोटी इतकी कर्ज रक्कम द.सा.द.शे.८% व्याजदर आकारुन १५ वर्षाच्या कर्ज परतफेडीच्या कालावधीसाठी बाब टिप्पणीत प्रस्तावित केलेल्या अटींच्या अधीन राहून देण्यास मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** एस्क्रो खात्यासंबंधी तपशील व कर्ज परतफेडीतील सूटीचा कालावधी निश्चित करणे, तसेच कर्जाची रक्कम, व्याजदर आणि कर्ज परतफेडीचा कालावधी या अटींव्यतिरिक्त प्रकल्प अंमलबजावणी कालावधी, आगाऊ कर्ज सहाय्य देणे तसेच कर्जाच्या इतर अटी व शर्तीमध्ये आवश्यक सुधारणा करण्यासाठी महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र.६ :</u> <u>मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत पादचा-यांसाठी उभारण्यात येणा-या उन्नत मार्गाच्या (Pedestrian Sky Walk) कामाच्या सुधारीत खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.</u>**

६.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असून जागतिक दर्जाचे व्यापार व उद्योग केंद्र म्हणून देशाच्या व राज्याच्या अर्थव्यवस्थेत मुंबईचे महत्व व स्थान अनन्यसाधारण आहे. तथापि, जागतिक दर्जाच्या पायाभूत नागरी सुविधांच्या अभावामुळे आणि मुंबई शहरातील वाढती गर्दी, वाहनांची वाढती

संख्या व त्यामुळे सतत होणारी वाहतूकीची कोंडी इत्यादींचा शहराच्या प्रगतीवर तसेच एकूणच जनसामान्यांवर परिणाम होऊ लागला आहे. विशेषतः मुंबई शहर, उपनगरे व महानगर प्रदेशातील रेल्वे स्थानकांच्या परिसरात रेल्वेने ये-जा करणारे प्रवासी, बस टॅक्सी, खाजगी वाहने इत्यादींमुळे रेल्वे स्थानकालगतच्या परिसरात प्रचंड प्रमाणात गर्दी होते. तसेच फेरीवाल्यांकडून झालेली पदपथावरील अतिक्रमणे, वाहनतळ, पदपथ अस्तित्वात नसणे इ. मुळे प्रवाशांना स्थानकांच्या परिसरात ये-जा करणे अडचणीचे, त्रासाचे आणि रस्त्यावरुन नाईलाजाने चालावे लागल्याने धोक्याचे देखील होते, त्यामुळे प्रवाशांना रेल्वे स्थानकांच्या परिसरातून थेट बाहेर पडणे सुलभ व जलद व्हावे यासाठी प्राधिकरणाने मुंबई महानगर परिसरातील विविध रेल्वे स्थानकांलगतच्या परिसरात स्कायवॉक बांधण्याचा प्रकल्प हाती घेतला आहे. स्कायवॉकमुळे रेल्वेतून ये-जा करणा-या प्रवाशांना पादचारी व वाहनांच्या गर्दीच्या अडथळयातून जावे न लागता रेल्वे स्थानकांच्या पादचारी पुलाच्या उन्नत पातळीवरुन मोकळया मार्गाने बाहेर येऊन सोयीच्या विविध ठिकाणी उतरता येणार आहे. मुंबई शहरात आणि मुंबई महानगर प्रदेशामध्ये हे स्कायवॉक बांधण्याचे काम प्राधिकरणाने हाती घेतलेले आहे, त्याबद्दल श्री.वसंत डावखरे, सदस्य यांनी विरोध दर्शविला. त्यांनी असे मत व्यक्त केले की, प्राधिकरण हे विनाकारण पैशाची उधळपट्टी करीत आहे. स्कायवॉक बांधण्यासाठी काही ठिकाणी विरोध होत आहे. याबाबत मुंबईच्या महापौर श्रीमती (डॉ.) शुभा राऊळ यांनीसुध्दा असे मत व्यक्त केले की, स्कायवॉक बांधण्यापूर्वी नगरसेवकांना आणि स्थानिक प्रतिनिधींना विश्वासात घेतले जात नाही.

**६.२** महानगर आयुक्तांनी असेही सांगितले की, सदर स्कायवॉकची रेल्वे स्थानकाजवळ आवश्यकता असल्याबाबत स्थानिक प्रतिनिधींशी म्हणजेच नगरसेवक आणि आमदारांशी चर्चा करण्यात येते. तसेच वाहतूक पोलिस यांच्या बरोबर सुध्दा चर्चा करण्यात येते. त्यानंतर त्या ठिकाणी स्कायवॉक बांधावयाचा की नाही याबाबत प्राधिकरण निर्णय घेते. महानगर आयुक्तांनी असे सांगितले की, स्कायवॉक बांधकामाची एकूण ६७ कामे प्राधिकरणाने हाती घेण्याचे ठरविले आहे.

**६.३** प्राधिकरणाच्या ११९ व्या बैठकीत २० रेल्वे स्थानकांच्या परिसरात स्कायवॉक बांधण्यासाठी रु.६००.०० कोटी एवढया खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली होती.

त्यापैकी प्रथमतः प्रायोगिक तत्वावर वांद्रे (पूर्व) ते कलानगर स्कायवॉक पूर्ण करुन नागरिकांसाठी खुला करण्यात आला. सदर स्कायवॉकच्या बांधकामामुळे झालेल्या सुखसोयीमुळे मुंबई महानगर प्रदेशातील विविध घटकांकडून व विविध स्तरांवरुन आणि लोकप्रतिनिधींकडून स्कायवॉकची मागणी प्रचंड प्रमाणात वाढली. त्यामुळे एकूण स्कायवॉक उभारणीच्या संख्येमध्ये, व्याप्तीमध्ये मोठया प्रमाणात वाढ झाली. त्यानुसार प्राधिकरणाच्या १२२ व्या बैठकीमध्ये तत्कालीन सद्यःस्थिती अहवाल सादर करण्यात आला होता. त्यानुसार एकूण ५४ स्कायवॉकची बांधकामे अंतर्भूत होती. सदर कामे प्रगतीपथावर असून लोकप्रतिनिधी, जनता, वाहतूक पोलीस प्राधिकरण इत्यादींनी यांनी सुचविलेली अतिरिक्त स्कायवॉकची बांधकामेदेखील हाती घेण्यात येत आहेत. त्याची एकूण संख्या ६७ असून सदरच्या स्कायवॉकच्या कामाची सद्यःस्थिती खालीलप्रमाणे आहे:-

| अ.क्र. | स्कायवॉकचा तपशिल | एकूण संख्या |
|---|---|---|
| १. | पूर्ण झालेले | ०१ |
| २. | प्रगतीपथावर असलेले | ४८ |
| ३. | निविदा मागविण्यात आलेले | ०८ |
| ४. | निविदा प्रस्तावित | ०४ |
| ५. | नविन प्रस्तावित | ०६ |
| | **एकूण :** | ६७ |

**६.४** स्कायवॉकचे संरेखन व संकल्पचित्रे निश्चित केल्यानंतर त्यांची अंदाजपत्रके सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २००७-०८ च्या दरसूचीनुसार करण्यात आली असून त्याचा एकूण प्रत्यक्ष खर्च रु.१,४११/- कोटी इतका अपेक्षित आहे आणि प्रकल्प सल्लागारांच्या फी वरील खर्च रु.७०/- कोटी अपेक्षित आहे. त्याचा तपशिल बाब टिपणीच्या जोडपत्र-१ मध्ये दर्शविला आहे.

६.५ श्री. वसंत डावखरे, सदस्य, प्राधिकरण यांनी सांगितले की, ठाणे पूर्वेला स्कायवॉक न बांधण्याबाबत आंदोलने झालेली आहेत. त्यामुळे आवश्यक असेल तेथेच स्कायवॉक बांधण्यात यावा. श्री.रविंद्र वायकर, अध्यक्ष, स्थायी समिती, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी सुध्दा असे मत व्यक्त केले की, स्थानिक प्रतिनिधींचा स्कायवॉक बांधण्याबाबत विरोध आहे आणि स्कायवॉक बांधण्याबाबत जबरदस्ती करण्यात येऊ नये. मुंबईच्या महापौर श्रीमती.(डॉ.) शुभा राऊळ, यांनी अशी माहिती दिली की, काही ठिकाणी नगरसेवकांना याबाबत चर्चा करण्यासाठी बोलाविण्यात

आलेले नाही. श्री.रविंद्र वायकर, अध्यक्ष, स्थायी समिती, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी असे सांगितले की, त्यांनी १६ प्रभागांना भेटी दिल्या तेव्हा त्यांना असे आढळून आले की, मुंबई महानगर प्राधिकरणामार्फत कोणाही नगरसेवकास बोलाविण्यात आले नाही. या स्कायवॉकवर फेरीवाल्यांना धंदा करण्याची परवानगी मुळीच देण्यात येऊ नये. मा.उच्च न्यायालयाने नुकताच फेरीवाल्यांविरुद्ध निर्णय दिला आहे. श्री.सुनील प्रभू, नगरसेवक व सदस्य यांनी अशी सूचना केली की, मालाड (पूर्व) चे लोक स्कायवॉकची मागणी करीत आहेत. श्री.आशिष शेलार, सदस्य यांनी असे मत प्रदर्शित केले की, प्रकल्प सल्लागारांच्या फि वरील खर्च रु.७० कोटी हा अवाढव्य वाटतो. याबाबत महानगर आयुक्तांनी असे स्पष्ट केले की, या सल्लागारांकडे स्कायवॉकचे संरेखन व संकल्प चित्रे निश्चित केल्यानंतर त्यांची अंदाजपत्रके सल्लागारांकडून करण्यात आली आहेत. मुंबईच्या महापौर श्रीमती.(डॉ.) शुभा राऊळ, यांनी असे सांगितले की, बोरीवली पश्चिमेस स्कायवॉकचा काहीही उपयोग नसून बोरीवलीच्या पूर्व भागात हा स्कायवॉक बांधण्यात यावा. महापालिका आयुक्त, डॉ.ज.मो.फाटक यांनी असे स्पष्ट केले की, सदरहू प्रकल्पबाधित हे वाणिज्यिक असून त्यांच्यासाठी प्राधिकरणाने पुनर्वसनाची योजना सादर केली आहे. त्यावर श्री.वायकर, सदस्य यांनी असे सांगितले की, त्यासाठी आमचा विरोध आहे. मा.मुख्यमंत्री यांनी असे सांगितले की, स्कायवॉकची रुंदी वाढविण्यात यावी, जर प्रकल्पबाधित फेरीवाल्यांचे पुनर्वसन करावयाचे असेल त्या ठिकाणी स्कायवॉकची रुंदी वाढवून घेण्यात यावी. मा.मुख्यमंत्री व प्राधिकरणाचे अध्यक्ष यांनी असे निर्देश दिले की, जेथे शक्य असेल तेथेच फक्त वाणिज्यिक प्रकल्पबाधित व्यक्तींच्या उपयोगासाठी स्कायवॉकचा उपयोग करण्यात यावा.

**६.६** त्यानंतर, या प्रस्तावावर सविस्तर चर्चा केल्यानंतर या प्रस्तावाला प्राधिकरणाने मान्यता देऊन पुढील ठराव मंजूर केला :

**ठराव क्र.१२०२ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १२ चे उपकलम (१) चे पोट-कलम (ग) व (आय) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर

करुन, प्राधिकरण याद्वारे प्राधिकरण याद्वारे प्राधिकरण क्षेत्रातील एकूण ६७ स्कायवॉकच्या बांधकामास व त्यासाठी लागणा-या अंदाजित रु.१,४११/- कोटीच्या सुधारीत खर्चास तसेच उपरोक्त स्कायवॉकच्या बांधकामाच्या देखरेखीसाठी नेमण्यात येत असलेल्या प्रकल्प सल्लागारांच्या रु.७०/- कोटीच्या शुल्कास (एकूण रु.१४८१/- कोटी) प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. तसेच उपरोक्त ६७ स्कायवॉकपैकी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळातर्फे एकूण १४ स्कायवॉक, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका व रेल्वेतर्फे प्रत्येकी १ स्कायवॉकची (जोडपत्र-१ मध्ये दर्शविल्याप्रमाणे) बांधकामे करण्यासाठी मान्यता देण्यात येत आहे."

**<u>पटल बाब क्र.१ :</u>** **<u>टाटा पॉवर कंपनी लिमिटेड (टी.पी.सी.एल.) या संस्थेला "वीज ग्रहण केंद्र" स्थापन करणेसाठी दिर्घ मुदतीच्या भाडेपट्टयाने वांद्रे-कुर्ला संकुलातील "जी-टेक्स्ट" या ब्लॉकमधील "एसएफ-३" हा भूखंड वाटप करणेबाबत.</u>**

या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, प्राधिकरणाने त्यांच्या दिनांक ९ सप्टेंबर, १९९६ च्या ८४ व्या बैठकीमध्ये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३ चे पोटकलम (२) ला अनुसरुन मिळालेल्या अधिकारांचा वापर करुन आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरणाने याद्वारे मे.टाटा इलेक्ट्रीक पॉवर सप्लाय कंपनीला वांद्रे-कुर्ला संकुलातील "जी" ब्लॉकमधील २५०० चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड दर चौ.मी.ला रु.२/- प्रती दिन या भाडयाने तात्पुरते "वीज ग्रहण केंद्र" उभारण्यासाठी ३ वर्षाच्या कालावधीसाठी सर्व अटी व शर्तीनुसार वाटप करण्यास मंजूरी दिली होती.

वांद्रे-कुर्ला संकुलातील आंतरराष्ट्रीय वित्त व व्यापार केंद्रासाठी जो बृहत आराखडा तयार करण्यात आलेला आहे त्यामध्ये "जी" ब्लॉक रेल्वे स्थानकाजवळील उपयुक्तता संकुलात इतर वापरांसह "वीज गहण केंद्र" स्थापन करण्याचे प्रस्तावित करण्यात आले होते. तथापि, वीज ग्रहण केंद्रासह प्रस्तावित उपयुक्तता संकुल हे नजिकच्या भविष्यकाळामध्ये विकसित होण्याची शक्यता कमी आहे हे लक्षात घेता प्राधिकरणाने त्यांच्या दिनांक २४.८.१९९८ च्या

देकार पत्राद्वारे टाटा इलेक्ट्रीक सप्लाय कंपनीला व बी.एस.ई.एस. या कंपन्यांना वांद्रे-कुर्ला संकुलातील पूर्वी अस्थायी तत्वावर वाटप केलेले भूखंड मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) विनियम, १९७७ च्या अटी व शर्तीनुसार स्थायी तत्वावर वाटप करण्याचे कळविले होते. प्राधिकरणाच्या वरील देकारास बी.एस.ई.एस. या संस्थेने होकार कळविला. परंतू टाटा इलेक्ट्रीक पॉवर सप्लाय कंपनी या संस्थेने त्यावेळेस त्याबाबत काहीही कळविले नाही.

भूखंड वाटपाचा प्राधिकरणाने मान्य केलेला रु. ३,४४,४४८/- प्रति चौ.मी. बांधकाम क्षेत्र हा दर सध्याचा बाजारभाव आहे या आधारे प्राधिकरणाने दिनांक ८ ऑक्टोबर, २००८ च्या पत्राने टाटा पॉवर कंपनी लिमिटेड (टी.पी.सी.एल) या संस्थेला वीज ग्रहण केंद्र उभारण्यासाठी रु. ३,४४,४४८/- प्रति चौ.मी. बांधकाम क्षेत्र म्हणजेच रु. ८६,११,२०,०००/- या अधिमूल्याच्या दराने ८० वर्षाच्या भाडेपटट्‌याकराराने भूखंड वाटप करणेबाबत देकारपत्र दिले. त्यांनी त्यांच्या दिनांक १५ डिसेंबर, २००८ च्या पत्राने सदर देकार मान्य असल्याचे कळविले व त्यानुसार प्राधिकरणाने दिनांक ३१ डिसेंबर, २००८ च्या पत्राने टाटा पॉवर कंपनी लिमिटेड (टी.पी.सी.एल.) या संस्थेला वीज ग्रहण केंद्र उभारण्यासाठी रु. ३,४४,४४८/- प्रति चौ.मी. बांधकाम क्षेत्र म्हणजेच रु. ८६,११,२०,०००/- या अधिमूल्याच्या दराने ८० वर्षाच्या भाडेपटट्‌याकराराने भूखंड वाटप करणेबाबत पत्र दिले. टाटा पॉवर कंपनी लिमिटेड (टी.पी.सी.एल.) या संस्थेने दिनांक २८ जानेवारी, २००९ च्या पत्राने अधिमूल्याची पूर्ण रक्कम रु. ८६,११,२०,०००/- प्राधिकरणाकडे जमा केली आहे.

त्यानंतर महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, टाटा पॉवर कंपनी लिमिटेड (टी.पी.सी.एल.) या संस्थेस वांद्रे-कुर्ला संकुलातील "जी-टेक्स्ट" या ब्लॉकमधील "एस्‌एफ्‌-३" हा २५०० चौ.मी.क्षेत्रफळाचा, ज्यावर १ चटई क्षेत्र निर्देशांक उपलब्ध आहे, असा भूखंड रु.३,४४,४४८/- प्रति.चौ.मी.बांधकाम क्षेत्र या अधिमूल्याच्या दराने एकूण रु.८६,११,२०,०००/- या अधिमूल्याने ८० वर्षाच्या भाडेपट्‌टयाने भूखंड वाटप करण्याच्या कार्यवाहीस कार्योत्तर मंजूरी प्राधिकरणाने द्यावी असा प्रस्ताव आहे.

..२३/-

त्यानंतर बाब टिपण्णीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.१२०३ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३ चे पोट-कलम (२) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, प्राधिकरण याद्वारे तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) विनियम, १९७७ मधील विनियम क्र.१६ नुसार प्राप्त झालेल्या शक्तींचा वापर करुन जमीन विल्हेवाट विनियम शिथिल करुन या टिप्पणीसोबत जोडण्यात आलेल्या नकाशात दर्शविल्याप्रमाणे (जोडपत्र-२अ व २ब) वीज ग्रहण केंद्राच्या बांधकामासाठी ८० वर्षाच्या भाडेपट्टयाने वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "जीटेक्स्ट" ब्लॉकमधील "एसएफ-३" हा २५०० चौ.मी. क्षेत्रफळाचा, ज्यावर १ चटईक्षेत्र निर्देशांक उपलब्ध आहे, असा भूखंड रु.३,४४,४४८/- प्रती चौ.मी. बांधकाम क्षेत्र या अधिमूल्याच्या दराने एकूण रु.८६,११,२०,०००/- (रु.शहाऐंशी कोटी अकरा लाख वीस हजार फक्त) इतकी रक्कम स्विकारुन टाटा पॉवर कंपनी लिमिटेड (टी.पी.सी.एल.) यांस केलेल्या भूखंड वाटपाच्या कार्यवाहीस हे प्राधिकरण कार्योत्तर मंजूरी देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** या भूखंड वाटपाच्या संबंधीत पुढील योग्य ती सर्व कार्यवाही करण्याकरीता तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण जमीन विल्हेवाट विनियम, १९७७ मधील प्रपत्र-ड मध्ये दिलेल्या भाडेपट्टयाच्या विलेखात आवश्यक ते बदल करुन याबाबतीत टाटा पॉवर कंपनी लिमिटेड (टी.पी.सी.एल.) या संस्थेशी भाडेपट्टा विलेख करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**पटल बाब क्र.२ :** **मुंबई महानगर प्रदेशातील पश्चिम उपप्रदेशासाठी सूर्याधरणातून पाणी उपलब्ध करण्यासाठी वन विभागाला निधी देण्याच्या कार्यवाहीबाबत.**

महानगर आयुक्तांनी याबाबत माहिती देताना असे सांगितले की, प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.स्वीस/प्रस/पापुवस्व/२००९/०५,

दिनांक ४ फेब्रुवारी, २००९ नुसार सूर्या धरणाची पाणी क्षमता वाढविण्यासाठी वन खात्यास त्यांच्या धोरणानुसार प्रकल्पास आवश्यक असलेली एन.पी.व्ही. (Net Present Value) म्हणून रु.९६.३३ कोटी देणे गरजेचे असून ते मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने द्यावे असे कळविले आहे. सूर्या प्रकल्प हा ठाणे जिल्हयातील आदिवासी भागातील बहुउद्देशिय प्रकल्प आहे. ठाणे जिल्हयाच्या विक्रमगड, डहाणू व पालघर तालुक्यातील सिंचनासाठी ६.७५ मेगावॅट वीजनिर्मिती करणे तसेच नजिकच्या मुंबई महानगर प्रदेशातील पश्चिम उप-प्रदेशातील पाणी पुरवठयात सुधारणा करणे अशी उद्दिष्टे आहेत. सूर्या प्रकल्प हा कोकण पाटबंधारे विभाग, महाराष्ट्र शासन हयांनी १९७६ साली सुरु करुन तो पूर्णत्वास आणला आहे. या धरणाची अंदाजे किंमत रु.३७९.२६ कोटी असून आतापर्यंत या कामावर रु.२८३.०५ इतका खर्च झालेला आहे.

त्यानुसार मुंबई महानगर प्रदेशाच्या पश्चिम उप-प्रदेशातील मिरा-भाईंदर महानगरपालिका व वसई, विरार, नालासोपारा व नवघर-माणिकपूर या नगरपरिषदा यांना सूर्याधरणातून सवलतीच्या दरात पाणी उपलब्ध होऊन यांच्या पाणी पुरवठयात सुधारणा होणार असल्याने व पश्चिम उप-प्रदेशात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे राबविण्यात येणा-या प्रस्तावित भाडे तत्वावरील निवासस्थाने बांधण्याच्या प्रकल्पासाठीही सुर्याधरणातून उपलब्ध होणारा पाणी पुरवठा उपयुक्त ठरणार असल्यामुळे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण सदर रु.९६.३३ कोटी एन.पी.व्ही. (Net Present Value) म्हणून वन खात्यास देण्यासाठी लागणा-या निधीची तरतूद ही अर्थसंकल्पीय शिर्ष-अभियांत्रिकी विभाग अनुक्रमांक ९ पायाभूत सोयी-सुविधांसह मुंबई महानगर क्षेत्रात भाडेतत्वावर निवासस्थाने बांधणे या शिर्षकाखाली रु.१०० कोटीची २००९-१० सालात सुचविलेल्या तरतूदीतून देण्याचे प्रस्तावित आहे. तसेच महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, प्रस्तावित पोशिर धरण प्रकल्पाच्या प्राथमिक सर्वेक्षणाच्या कामासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला रु.१ कोटी निधी देणे गरजेचे आहे.

त्यानंतर, बाब टिपणणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.१२०४ :-**

**“असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १२ चे उपकलम (१) चे पोट-कलम (क), (ड), (ई) व (ग) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, प्राधिकरण याद्वारे

१) सूर्या धरणावर गेट बसवून त्याची पाणी साठवण क्षमता वाढवून पश्चिम उप-प्रदेशासाठी सवलतीच्या दराने पाणी पुरवठा उपलब्ध करण्यासाठी आवश्यक असलेली एन.पी.व्ही.(Net Present Value) म्हणून रु.९६.३३ कोटी वनखात्यास देण्यासाठी लागणा-या निधीची तरतूद करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२) तसेच प्रस्तावित पोशिर धरण प्रकल्पाच्या प्राथमिक सर्वेक्षण कामासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला रु.१ कोटी निधी देण्यासाठी याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील प्रस्तावास राज्य शासनाची मंजूरी मिळाल्यानंतर अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

त्यानंतर, मा.अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त झाले.

***************

**जोडपत्रे - १, २(अ) व (ब)**

## प्रगतीपथावरील कामे (महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाद्वारे)

| अ.क्र. | कामे | किंमत (रु. कोटी) |
|---|---|---|
| १. | चिंचपोकळी | ८.३६ |
| २. | परेल | |
| ३. | रे रोड | ६.२६ |
| ४. | सेवरी | |
| ५. | सँडहर्स्ट रोड | |
| ६. | वडाळा रोड | |
| ७. | वसई रोड (पश्चिम) | ८.१३ |
| ८. | गोरेगाव (पश्चिम) | १५.५४ |
| ९. | विले पार्ले (पश्चिम) | १६.५९ |
| १०. | कांदिवली (पूर्व) | ३४.६२ |
| ११. | लोअर परेल - करी रोड वॉकवे (पूर्व) | २३.७७ |
| १२. | मस्जिद स्टेशन | ४३.०६ |
| १३. | नायगाव | ७.४६ |
| १४. | ग्रॅन्ट रोड | |

## प्रगतीपथावरील कामे (कल्याण डोंबिवली महानगरपालिकेद्वारे)

| अ.क्र. | कामे | किंमत (रु. कोटी) |
|---|---|---|
| १५. | कल्याण (पूर्व) | १५.४२ |
| १६. | कल्याण (पश्चिम) | ७१.६४ |

## रेल्वेद्वारे प्रस्तावित कामे

| अ.क्र. | कामे | किंमत (रु.कोटी) |
|---|---|---|
| १७. | नालासोपारा | २०.०० |

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाद्वारे प्रस्तावित कामे निविदा सूचना मागविण्यात आल्या आहेत.

| अ.क्र. | कामे | किंमत (रु. कोटी) |
|---|---|---|
| १८. | अंबरनाथ (पूर्व) | ९.०० |
| १९. | अंबरनाथ (पश्चिम) | ७.८७ |
| २०. | विक्रोळी (पूर्व) | ९.६४ |
| २१. | विक्रोळी (पश्चिम) | ८.५ |
| २२. | माहिम (पूर्व) | १६.९२ |
| २३. | माहिम (पश्चिम) | ४५.८० |
| २४. | घाटकोपर (पूर्व) | ४७.३२ |
| २५. | अंधेरी (पश्चिम) | २६.६५ |

## पूर्ण झालेले स्कायवॉक (मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाद्वारे)

| अ.क्र. | कामे | किंमत (रु.कोटी) |
|---|---|---|
| २६. | वांद्रे (पूर्व) | १३.६३ |

## प्रगतीपथावरील कामे (मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाद्वारे)

| अ.क्र. | कामे | किंमत (रु.कोटी) |
|---|---|---|
| २७. | कांजुरमार्ग (पूर्व) | ५.२५ |
| २८. | विरार (पश्चिम) | ९.१६ |
| २९. | विरार (पूर्व) | ४.२४ |
| ३०. | अंधेरी (पूर्व) | ३०.०० |
| ३१. | सांताक्रुझ (पूर्व) | २९.२३ |
| ३२. | दहिसर (पश्चिम) | २२.४२ |
| ३३. | उल्हासनगर (पूर्व) | १५.८१ |
| ३४. | उल्हासनगर (पश्चिम) | २९.१७ |
| ३५. | भांडुप (पश्चिम) | १५.६४ |
| ३६. | विद्याविहार (पूर्व) | ५.७० |
| ३७. | विद्याविहार (पश्चिम) | ७.२८ |
| ३८. | कुर्ला (पूर्व) | १३.२८ |
| ३९. | घाटकोपर (पश्चिम) | १३.९३ |
| ४०. | मुलुंड (पूर्व) | २७.५६ |
| ४१. | ठाणे (पूर्व) | ४०.६६ |
| ४२. | मीरा रोड | २१.३३ |
| ४३. | भाईंदर (पश्चिम) | २२.१३ |
| ४४. | मुलुंड (पश्चिम) | ५४.४७ |
| ४५. | बदलापूर (पूर्व) | १०.८९ |
| ४६. | बदलापूर (पश्चिम) | ९.८८ |
| ४७. | भाईंदर (पूर्व) | २१.४० |
| ४८. | बोरीवली (पश्चिम) | ३३.७४ |
| ४९. | कुर्ला (पश्चिम) | २४.३१ |
| ५०. | चेंबूर (३ पादचारी पुलांसह) | ७.१२ |
| ५१. | दादर (पूर्व) | ९.५९ |
| ५२. | दादर (पूर्व) | २१.४६ |
| ५३. | दादर (पूर्व) | २१.२० |
| ५४. | दहिसर (पूर्व) | १४.४५ |
| ५५. | सांताक्रुझ (पश्चिम) | २५.६७ |
| ५६. | वांद्रे (पूर्व) | ९.८५ |
| ५७. | वांद्रे (पश्चिम) | २३.९६ |

## निविदा सूचना मागविण्यात येणार आहेत.

| अ.क्र. | कामे | किंमत (रु. कोटी) |
|---|---|---|
| ५८. | महालक्ष्मी | १४४.०४ |
| ५९. | खडा-पारसी | |
| ६०. | सायन | |
| ६१. | अंधेरी (पूर्व) भाग - २ | |

## नविन प्रस्तावित स्कायवॉक


| अ.क्र. | कामे | किंमत (रु. कोटी) |
|---|---|---|
| ६२. | छत्रपती शिवाजी टर्मिनस ते चर्चगेट | २१०.०० |
| ६३. | चर्चगेट ते विधान भवन | |
| ६४. | विधान भवन ते रिगल सिनेमा | |
| ६५. | रिगल सिनेमा ते छत्रपती शिवाजी टर्मिनस | |
| ६६. | जुना टोलनाका,वाशी (सायन पनवेल महामार्ग) | |
| ६७. | कामोठे (सायन पनवेल महामार्ग) | |

एकुण (१ ते ६७) —— रु. १४११.०० कोटी – (अ)

प्रकल्प सल्लागार शुल्क —— रु. ७०.०० कोटी – (ब)

एकुण (अ + ब) —— रु. १४८१.०० कोटी

जोडपत्र-२ब




1. DO NOT SCALE THIS DRAWING.
   FOLLOW WRITTEN DIMENSIONS ONLY.
2. ALL DIMENSIONS ARE IN METERS.


DIMENSION & LOCATION PLAN OF PLOT NO SF-3(TEC) IN GN-BLOCK IN BKC.

M.M.R.D.A.
TOWN AND COUNTRY PLANNING DIVISION
PLOT NO C-14&C-15,BANDRA-KURLA COMPLEX
BANDRA(E),MUMBAI-400 051

| SCALE | DATE | DY. PLANNER | SR. PLANNER |
|---|---|---|---|
| 1:1000 | 29/12/08 | | |

12/30/2008 4:30:06 PM abc@

जोडपत्र-२अ



PLOT U/R (SF-3)
G-TXT BLOCK
GN BLOCK
G BLOCK
REVISIONS
BANDRA-KURLA COMPLEX
M.M.R.D.A.